**जिल्हा परिषदांतर्गत पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी स्वतंत्र विभाग व उपविभाग स्थापन करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु-१०९३/प्र.क्र.८१९/भाग २/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- ३० सप्टेंबर, १९९८**

**वाचा :-**

१. शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१०९३/प्र.क्र.-८१९/पापु.०७, दिनांक ६ मार्च, १९९७
२. शासन शुध्दीपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१०९३/प्र.क्र.-८१९/भाग २/ पापु.०७, दिनांक ३ डिसेंबर, १९९७

**प्रस्तावना :-**

संदर्भिय आदेशान्वये जिल्हा परिषदांतर्गत पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी स्वंतत्र विभाग व उपविभाग निर्माण करण्यात आले असून, त्यासाठी आवश्यक कर्मचारीवृंदही मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये पाणी पुरवठा विभागाकरीता "वरिष्ठ सहायक" संवर्गातील (लिपिकवर्गीय) रु.१२००-३०-१५६०-दरो-४०-२०४० या समयवेतनश्रेणीतील ५ पदे मंजूर करण्यात आली आहेत. पाणी पुरवठा विभागामध्ये लेखाविषयक कामकाज पाहण्यासाठी सहायक लेखा अधिकारी या पदाशिवाय इतर कोणतेही पद नसल्याने, वरिष्ठ सहायक संवर्गाच्या ५ मंजूर पदांपैकी एका पदाचे पदनाम 'वरिष्ठ सहायक (लेखा)' असे करण्याबाबत शासनाकडे निवेदने प्राप्त झाली होती. सदर निवेदनांचा विचार करुन पाणी पुरवठा विभागासाठी वरिष्ठ सहायक (लेखा) असे पदनाम मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

प्रस्तावनेत नमुद केलेली पार्श्वभुमी विचारात घेऊन शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक ६ मार्च, १९९७ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी मंजूर करण्यात आलेल्या आणि दिनांक ३ डिसेंबर, १९९७ च्या शुध्दीपत्रकान्व्ये वरिष्ठ सहायक (लिपिकवर्गीय) असे नामाभिदान केलेल्या रु.१२००-३०-१५६०-दरो-४०-२०४० या वेतनश्रेणीतील संवर्गाच्या ५ मंजूर पदांपैकी एका पदाचे पदनाम वरिष्ठ सहायक (लेखा (रु.१२००-३०-१५६०-दरो-४०-२०४०) असे करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. सदर वरिष्ठ सहायक (लेखा) संवर्गाची पदे जिल्हा परिषदेमधील लेखा कर्मचा-यांमधून भरण्याची कार्यवाही संबंधित मुख्य कार्यकारी अधिका-यांनी तात्काळ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने.

**(रु. न. देशमुख)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्र्याचे सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
महालेखापाल, महाराष्ट्र-०१, लेखा व परिक्षा, मुंबई (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-०१, लेखा व अनुज्ञेयता, मुंबई (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-०२, लेखा व परिक्षा, नागपूर (५ प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र-०२, लेखा व नागपूर, मुंबई (५ प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
अधिक्षक अभियंता, (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे
विभागीय उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, मुंबई
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, जि.प.सर्व
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
सर्व उपसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, मुंबई
वित्त विभाग (व्यय ३, १५ व अर्थसंकल्प १६)
नियोजन विभाग
पाटबंधारे विभाग
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती (कार्यासन क्र.पापु-०७)